Pahili Pariksha – Reading

# मांजर

मांजरीला चार पाय, दोन डोळे, एक शेपुट व लांब मिशा असतात. मांजरीचा रंग, पांढरा काळा, किंवा तपकिरी असतो. तिचे अंग मऊमऊ असते. ती झाडावर व खांबावर भरभर चढते. तिला उंदीर खूपच घाबरतात. ती उंदराला पटकन पकडते व खाऊन टाकते. ती वाघासारखी दिसते. मला मांजर फार आवडते.

प्रश्न

१. मांजर कशी दिसते?
२. मांजरीचा रंग कोणता असतो?
३. ती कशावर भरभर चढते?
४. तिच अंग कस असते?
५. ती कोणाला पकडते?

Pahili Pariksha – Reading

# <u>मनुचा झोपाळा</u>

मनुला झोपाळा आवडतो. पण झोका कोण देणार? आई काम करत होती. बाबा बाहेर गेले होते. मनुला रडू आले. दादा धावत आला आणि मोठा झोका दिला. मनु खूष झाली!

<u>प्रश्न</u>

१. मनुला काय आवडते?
२. आई काय करत होती?
३. बाबा कुठे गेले होते?
४. दादाने काय केले?
५. मनुला झोका मिळाल्यावर काय वाटले?

Pahili Pariksha - Reading

## अंगण

आई मला दाणे देशील का? मी दाणे अंगणात टाकेन.
चिमणी हळू हळू येईल, दोन-चार दाणे टिपेल.
हुशार कावळा येईल, दाणे टिपून पसार होईल.
पोपट मिठू मिठू गाणे गाईल, तो दाणे खाईल.
कोंबडा धावत पळत येईल, कोंबडीसोबत दाणे वेचून जाईल.
अंगणी सगळे येतील, अंगण सुंदर दिसेल.

प्रश्न

१. आई अंगणात फेकायला काय देईल?
२. चिमणी दाणे कसे टिपेल?
३. कावळा कसा आहे?
४. मिठू मिठू गाणे कोण गाईल?
५. कोंबडा कोणा सोबत येईल?

Pahili Pariksha - Reading

# विनूची बाग

दिवे आगर नावाचे एक लहानसे गाव होते. गावात चाळीस घरे होती. त्यातील एक घर विनुचे होते. घरी बाग होती. बागेत आंबा, पेरू, आणि फणस अशी फळझाडे होती. गरम हवेत काही झाडांना फळे लागली. झाडांवरील फणस पाहून ते आता खायचे का असे विनूने आईला विचारले.

## प्रश्न

१. विनुच्या  गावाचे नाव काय  ?
२. विनुच्या गावात किती घरे होती?
३. विनुच्या बागेत कुठली फळझाडे होती?
४. विनुला कुठले फळ खायचे होते?
५. झाडांना कधी फळे लागली?

Pahili / Dusari– Listening / Reading

# <u>कोंबडी आणि बदक</u>

एक होती कोंबडी अणि एक होतं बदक. बदक पित होतं पाणी आणि कोंबडी गात होती गाणी. कोंबडीला लागली तहान. ती गेली बदकाकडे. तिनं बदकाला विचारलं, "बदक दादा मला देतोस थोडं पाणी?"

"तू मला काय देशील?" बदकानं उलट विचारलं

"मी तुला गाणं गाऊन दाखवीन, चालेल"?

"चालेल की, हे घे पाणी" बदकानं चोचीत पाणी घेतलं. कोंबडी काठावर उभी होती. तिथे तिला नेऊन दिलं.

पाणी पिऊन कोंबडी खुष झाली. गोडगोड गाणं गाऊ लागली.

बदक देखील <u>खुष</u> झालं. गाणं ऐकू लागलं

<u>प्रश्न</u>

१. कोंबडी बदकाकडे का गेली?

२ बदक काय करत होते?

३. कोंबडीने बदकाला काय विचारले?

४. कोंबडी कोठे उभी होती?

५. पाणी पिऊन कोंबडिने काय केले?

Pahili / Dusari– Listening / Reading

# बाग

एक रंगीबेरंगी फुलांनी बहरलेली सुंदर बाग होती. हिरवा, गुलाबी, लाल, पिवळा, जांभळा आणि निळा या विविध रंगांनी ती बाग फुललेली असायची. अनेक पक्षी आणि छान छान फुलपाखरांमुळे ती बाग अधिकच सुंदर दिसायची. बागेत मधोमध एक मोठे तळे होते. तळयाचे पाणी निळे होते. तळयात हंस, बदके, बगळे असे पक्षी होते.

## प्रश्न

१. कोणकोणत्या रंगानी बाग फुललेली असायची?
२. कश्यामुळे बाग अधिकच सुंदर दिसायची?
३. बागेत मधोमध काय होते?
४. तळयाच्या पाण्याचा रंग कोणता होता?
५. तळयात कोणते पक्षी होते?

Dusari Pariksha - Reading

# पाणी वाचवा

सुभाष पाणी जपून वापरतो. दात घासताना तो नळ बंद करतो. तो झटपट आंघोळ करतो. तो सायकल धुताना थोडेसेच पाणी वापरतो. नळ गळत असला तर तो लगेच आई किंवा बाबाला सांगतो.

## प्रश्न

१. सुभाष दात घासताना काय करतो?
२. तो सायकल कशी धुतो?
३. तो आई किंवा बाबाला काय सांगतो?
४. सुभाष पाणी कसे वापरतो ?
५. पाण्याचा एक उपयोग सांगा.

Dusari Pariksha- Listening

## गुऱ्हाळ

रमेश – बाबा गुळ कुठे बनवतात?
बाबा – अरे, गुळ गुऱ्हाळात बनवतात. उद्या आपण तिथे जाऊया.
केतकी – ऊसापासून गुळ तयार करतात नाही का?
बाबा – हो. फक्त गुळच नाही तर साखरही तयार करतात.
केतकी– पण बाबा ऊस तर बांबूसारखा दिसतो मग त्यापासून गूळ हो कसा तयार करतात?
बाबा – ऊसात गोड रस असतो. ऊस चरकात घालून त्याचा रस काढतात. चरक म्हणजे मोठे चाकासारखे मशीन.
रमेश – तोच रस इथल्या मोठ्या कढईत दिसतो आहे ना!
बाबा – होय! या कढईला 'काहील' म्हणतात. ह्यात रस उकळतात. मग तो रस आटतो. नंतर आटलेल्या रसाची काकवी होते. आणखी घट्ट झाला की गुळ होतो.
केतकी – चला तर आपण ऊसाचा रस पिऊया, गुळ खाऊ आणि काकवी घरी घेऊन जाऊ!

प्रश्न

१. गुळ कोठे तयार करतात?
२. गुळ व साखर कशापासून होते?
३. ऊसाचा रस कसा काढतात?
४. काहिल आणि चरक म्हणजे काय?
५. आटवलेल्या रसाला काय म्हणतात?

Dusari Pariksha – Listening

# रियाच्या कुकीज

आज रियाने कुकीज आणि लेमोनेड विकायचे ठरवले. आईच्या मदतीने तिने त्यांच्या घरासमोर एक टेबल ठेवले. तिने चार वेगवेगळ्या प्रकारच्या कुकीज ठेवल्या होत्या आणि दोन प्रकारची लेमोनेड ठेवली होती. एका कुकीची किंमत १ डॉलर होती. एका लेमोनेडची किंमतसुद्धा १ डॉलर होती. पण कुकी आणि लेमोनेड एकत्र घेतले तर त्यांची किंमत १ डॉलर ५० सेंट्स होती.

तिच्या कडून खूप जणांनी कुकी आणि लेमोनेड विकत घेतले. बहुतेक सर्वांनीच तिला २५ सेंट्स टिप म्हणून दिले.

प्रश्न

१. वरील गोष्टीत रियाने काय विकायचे ठरवले आहे?
२. रियाला कोणी मदत केली?
३. रियाने किती प्रकारच्या कुकीज विकायला ठेवल्या होत्या?
४. एका लेमोनेडची किंमत किती होती?
५. रियाला किती सेंट्स टिप म्हणून मिळत होते?

Tisari Pariksha- Reading

# आवडता आकार

राधा म्हणते गोल आकार किती मस्त दिसतो. खेळायचा चेंडू गोल, आणि आईस्क्रीमचा गोळा पण गोल! गोलगोल पिझ्झा आणि कुकी बघून तर तोंडाला पाणीच सुटते! सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, चंद्र, सूर्य आणि पृथ्वीसुद्धा गोलच असतात. मला तर माझ्या गुबगुबीत गोल उशी शिवाय झोपच येत नाही!

प्रश्न

१. राधाचा सर्वांत आवडता आकार कोणता असेल?
२. राधाला गोल आकाराच्या कोणत्या वस्तू आवडतात?
३. गोल आकार का महत्त्वाचा आहे?
४. तुम्हाला गोल आकाराच्या कोणत्या वस्तू माहित आहेत?
५. तुमचा आवडता आकार कोणता आणि का?

Tisari Pariksha- Reading

# चतुर मुली

एका गावात राम नावाचा शेतकरी रहात होता. त्याला दोन मुली होत्या. एकदा त्या दोन्ही मुली जत्रेला जायला निघाल्या. त्यांनी विचारलं, “बाबा, आम्ही तुमच्यासाठी काय आणू?” तो शेतकरी मोठया मुलीला म्हणाला, “तू माझ्यासाठी कागदामध्ये प्रकाश (Light) बांधून आण.” आणि छोट्या मुलीला म्हणाला, “तू माझ्यासाठी कागदामध्ये वारा (Wind) बांधून आण.”

त्या दोघी सकाळी जत्रेला निघाल्या आणि संध्याकाळी घरी आल्या. शेतकऱ्याने मोठया मुलीला विचारलं, “मग काय काय आणलत माझ्यासाठी?” यावर मोठी मुलगी आतून दिवा लावलेला कागदाचा कंदील घेऊन आली.

त्यानंतर छोट्या मुलीने कागदाचा पंखा बाबांच्या हाती दिला आणि म्हणाली, “बाबा, हा पंखा हातात घेऊन हलवीत रहा. त्यातून छान वारा येईल” आपल्या दोन्ही मुली चतुर असल्याचा शेतकऱ्याला अभिमान वाटला.

<u>प्रश्न</u>

१. गोष्टीत किती जण आहेत?
२. शेतकऱ्याने मुलींना काय आणायला सांगितले?
३. मोठ्या मुलीने कोणती वस्तू आणली?
४. छोट्या मुलीने कोणती वस्तू आणली?
५. शेतकऱ्याच्या मुली कश्या होत्या?

Tisari Pariksha- Listening

## एपीजे अब्दुल कलाम

भारताचे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम सर्वात लोकप्रिय राष्ट्रपतींमधील एक मानले जातात. त्यांना 'सामान्य जनतेचा राष्ट्रपती' असेही म्हणतात. भारताचे 'मिसाइलमॅन' अशी त्यांची ओळख आहे. कलाम सतत काहीतरी नवीन शोधत असायचे. भरपूर वेळेस त्यांना अपयशही यायचे; पण त्यांनी कधी हार मानली नाही.

विद्यार्थी असताना कलाम यांना एक प्रोजेक्ट बनवायचा होता. पण कलाम यांच्या संघाचे काहीच झाले नव्हते. त्यांचे सर हे पाहून त्यांच्यावर खूप रागावले व म्हणाले की प्रोजेक्ट सात दिवसांत झालाच पाहिजे.

कलाम व त्यांचे मित्र प्रोजेक्टच्या कामाला लागले. एका खोलीत सतत एक आठवडा काम करत होते. कलाम यांच्या दृढ निश्चयाने ते काम सात दिवसांत पूर्ण केले, ते पाहून सरांना आश्चर्य वाटले. कलाम यांनी जो प्रोजेक्ट बनवला तो आतापर्यंत कोणीच बनवू शकले नाही. सरांनी प्रोजेक्ट पाहिला व कलाम यांचे कौतुक केले.

प्रश्न

१. एपीजे अब्दुल कलाम यांची काय ओळख आहे?
२. अपयश आले तरी कलाम काय करीत असत?
३. कलामांचे सर का रागावले?
४. प्रोजेक्ट पूर्ण करायला सरांनी किती वेळ दिला होता?
५. कलम आणि त्यांचे मित्र किती वेळ एका खोलीत काम करत होते?

Tisari Pariksha- Listening

# उस्ताद झाकिर हुसैन

जगप्रसिद्ध तबला वाजविणारे झाकिर हुसैन यांचा जन्म ९ मार्च १९५१ या दिवशी झाला. वयाच्या १२ वर्षापासून त्यांनी तबला वादनामुळे लोकांची मने जिंकली. १९७३ साली त्यांनी "लिव्हिंग इन द वर्ल्ड" हा अल्बम काढला. त्यांच्या तबल्याची जादू जगभर पसरली. त्यांनी अनेक भारतीय आणि जागतिक समारंभात तबला वाजविला. अप्रतिम तबला वादनामुळे ते खूप लोकप्रिय झाले. सर्वजण त्यांना "उस्ताद झाकिर हुसैन" म्हणून ओळखू लागले.

भारत सरकारने त्यांना पद्मश्री व पद्मविभूषण या पदव्या देवून सन्मान केला. तसेच त्यांना १९९९ व २००९ साली "ग्रॅमी" अवार्ड पण मिळाले. "भारतीय शास्त्रिय संगित आणि ज्याझ फ्युजन" (Indian classical music and jazz fusion) यात त्यांचे नाव घेतले जाते.

प्रश्न

१. झाकिर हुसैन कोण आहेत?
२. वयाच्या कितव्या वर्षापासून त्यांचे नाव लोकांना कळले?
३. त्यांनी पहिला अल्बम कधी काढला? व नाव काय?
४. त्यांना कोणत्या पदव्या दिल्या?
५. सध्या ते कोणत्या संगिता मुळे प्रसिध्द आहेत?

Chauthi Pariksha – Reading

# स्वप्न

स्वप्न फारच जादुई असतात. आपल्याला एखादे गंमतशीर किंवा मस्त स्वप्न पडले की आपण भारी खूष होतो. पण जर भयानक स्वप्न पडले तर मात्र भीतीने झोपेतून जागे होते. घाबरगुंडी उडते! काही स्वप्न आपल्याला आठवतच नाहीत तर काही इतकी खरी वाटतात की स्वप्नातल्या गोष्टी खरच घडल्या की काय असे वाटते. शास्त्रज्ञांनी स्वप्न या विषयावर बराच अभ्यास  केला आहे.

प्रश्न

१. स्वप्न कोणत्या प्रकारची असतात?
२. भयानक स्वप्न पडले की काय होते?
३. स्वप्न या विषयावर कोणी अभ्यास केला आहे?
४. तुम्हाला पडलेल्या एखाद्या स्वप्नाबद्दल सांगा. (दोन गुण)

Chauthi / Pachavi –Reading

# <u>सुपरबॉल</u>

फुटबॉल या खेळाच्या विजेतेपदासाठी दरवर्षी होणारी चुरस म्हणजे सुपरबॉल. अमेरिकेतील राष्ट्रीय फुटबॉल संघटनेत असलेले ३२ संघ दोन गटांत विभागलेले आहेत. ते राष्ट्रीय फुटबॉल संघ आणि अमेरिकन फुटबॉल संघ या नावाने ओळखले जातात. हिवाळ्यात फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या रविवारी अंतिम फेरीत पोहोचलेल्या दोन संघात लढत होते. हा रविवार ‘सुपरबॉल सन्डे’ म्हणून ओळखला जातो. २०१६ हे सुपरबॉलचं ५० वे वर्ष.

सुपरबॉल सन्डेच्या निमित्ताने सगळे एकत्र जमतात. फराळ करून गप्पा मारत लाखो लोक हा खेळ टीव्हीवर पाहतात. हा खेळ जितका खेळासाठी प्रसिद्ध आहे, तितकाच <u>मध्यांतरात</u> (Half time) होणारे कार्यक्रम आणि जाहिरातींसाठीही प्रसिध्द आहे. सुपरबॉल <u>प्रसाराच्या</u> (Broadcast) दरम्यान टीव्हीवर जाहिरात झळकण्यासाठी कंपन्यांना ३० सेकंदांसाठी जवळजवळ ३० लाख डॉलर्स मोजावे लागतात.

<u>प्रश्न</u>

१. सुपरबॉल म्हणजे काय?
२. ‘सुपरबॉल सन्डे’ कोणत्या रविवार ला म्हणतात?
३. २०१६ हे सुपरबॉल कितवे वर्ष होते?
४. सुपरबॉल हा खेळाशिवाय अजून कश्यासाठी प्रसिध्द आहे?
५. सुपरबॉल प्रक्षेपणाच्या दरम्यान कंपन्या काय करतात?

Chauthi / Pachavi – Reading

# पहिला पक्षी कोणता असावा?

१९६१ साली जर्मनीमध्ये डायनॉसॉरसचा अभ्यास करण्यासाठी जमिनीमध्ये खोदकाम सुरू झाले. त्यामध्ये एका दगडात खूप वेगळा ठसा दिसला. एखाद्या छोट्या डायनॉसॉरस सारखा. त्याच्या चोचीसारख्या तोंडात दात होते. शेपटीमध्ये हाडे होती. तो अंडी घालत असावा. ह्या सर्व गोष्टी सरपटणाऱ्या प्राण्यांसारख्या होत्या. पिसांमुळे तो पक्षी आहे हे समजले. त्याच्यामध्ये सरपटणारे प्राणी आणि पक्षी या दोघांचेही अवयव होते. त्याचे नाव ठेवले आर्किऑप्टरेक्स (Archaeopteryx).

हा पक्षी साधारण पंधरा कोटी वर्षांपूर्वीचा असावा असा अंदाज केला गेला. ह्या पक्षाच्या दोन्ही पंखांना जोडणारे एक हाड होते. ते इंग्लिश 'यू' अक्षरा सारखे दिसत होते . पंख वर खाली हलवण्यासाठी ते हाड खूप महत्त्वाचे असावे. ह्या पक्षापासून इतर पक्षी कसे निर्माण झाले असतील ते समजले.

प्रश्न

१. कोणाचा ठसा सापडला?
२. खोदकाम कुठे व कोणत्या साली झाले?
३. त्या प्राण्याचे वर्णन करा.
४. किती वर्षापूर्वीचा प्राणी असावा?
५. सरपटणारे प्राणी उडतात का? का नाही?

Chauthi / Pachavi – Reading

# पाणी

तुम्हाला माहिती आहे का - पृथ्वीवरचे फक्त एक टक्का पाणी लोकांच्या वापराकरता उपलब्ध आहे! बाकीचे सर्व पाणी समुद्रातले खारं पाणी आहे किंवा बर्फात गोठलेलं आहे - जे लोकांना पिण्याकरता, कपडे धुण्याकरता किंवा बागेकरता वापरता येत नाही. जशी पृथ्वीवरची जनसंख्या वाढते आहे, तशी लोकांची पाण्याची गरज पण वाढते आहे. पृथ्वीवर पाण्याचा साठा मर्यादित आहे.

पृथ्वीवरचा पाणी पुरवठा पावसावर अवलंबून आहे. मागच्या वर्षी मॉनसूनमधे कमी पाऊस पडल्यामुळे महाराष्ट्रात दुष्काळ पडला आहे. छोट्या खेडेगावात आठवड्यातून एकदाच नळाला पाणी येतं. आपण सर्वांनीच पाणी जपून वापरले पाहिजे.

प्रश्न

१. पृथ्वीवरचे किती टक्के पाणी पिण्याकरता वापरता येते?
२. पृथ्वीवरची पाण्याची गरज कशामुळे वाढते आहे?
३. पृथ्वीवरचा पाणी पुरवठा कशावर अवलंबून आहे?
४. दुष्काळ म्हणजे काय?
५. तुम्ही पाणी कसे वाचवाल?

Pachavi – Listening

# अमेरिकन अध्यक्षीय निवडणुक-२०१६

८ नोव्हेंबर २०१६ रोजी अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुका होणार आहेत. अमेरिकेतील डेमॉक्रॅटिक आणि रिपब्लिकन हे दोन महत्त्वाचे पक्ष आहेत. आपले उमेदवार जुलै-ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या पक्षांच्या राष्ट्रीय अधिवेशनात निवडतात. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन १८ ते २१ जुलै २०१६ रोजी क्लिव्हलँड येथे होणार आहे. डेमॉक्रॅटिक पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन २५ ते २८ जुलै २०१६ रोजी फिलाडेल्फिया या ऐतिहासिक शहरात होणार आहे. या अधिवेशनांमध्ये रिपब्लिकन पक्षाचे एकूण २४७२ प्रतिनिधी आणि डेमॉक्रॅटिक पक्षाचे एकूण ४७६४ प्रतिनिधी त्यांच्या पक्षांचे उमेदवार निवडणार आहेत.

डेमॉक्रॅटिक पक्षात हिलरी क्लिंटन या उमेदवार आघाडीवर आहेत. बर्नी सॅन्डर्स हे दुसऱ्या क्रमांकावर आहेत. रिपब्लिकन पक्षात डॉनल्ड ट्रम्प हे उमेदवार आघाडीवर आहेत आणि टेड क्रुझ दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

प्रश्न

१. अमेरिकेतील दोन महत्त्वाचे पक्ष आपले उमेदवार कधी निवडतात?
२. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन २०१६ मध्ये कधी होणार आहे?
३. डेमॉक्रॅटिक पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन २०१६ मध्ये कुठे होणार आहे?
४. रिपब्लिकन पक्षात दुसऱ्या क्रमांकावर कोणता उमेदवार आहे?
५. डेमॉक्रॅटिक पक्षात कोण आघाडीवर आहे?